ICSE ACADEMY
www.spellbeeacademy.com

SpellIndia
INDIA's No. 1
SPELLING BEE
Preparatory Study Material Provider
www.phonicsestore.com

Pati's

# Past Year Papers

# PREPARE

for

# ICSE

Class 10

# Marathi

2023 - 2026

Pati's

# ICSE ACADEMY:
# How to Prepare for ICSE Class 10 exams

https://www.spellbeeacademy.com/icse.html

## How to Prepare for ICSE Class 10 exams : Free Resources

Please click on subject to proceed further.


We will keep adding resources here till "March 2026".


So, save this link, keep visiting and stay updated.


( Resources include : Syllabus, Past Year Papers, Specimen Papers, Competency based Questions, Books pdf downloadable, 350+ Term Papers / Prelim Papers of various schools - across subjects, etc. )


01 English Literature
02 English Language
03 Geography
04 History & Civics
05 Physics
06 Chemistry
07 Mathematics
08 Biology
09 Computer Applications
10 Physical Education
11 Hindi
12 Commercial Studies
13 Economics
14 Technical Drawing
15 Environmental Science
16 Home Science
17 Gujarati
18 Marathi
19 French

**SCAN QR code to buy the book at amazon NOW.**







**Scan QR code** for Free Access to
500+ Prelim Papers across 20 subjects





# Prepare for ICSE CLASS 10
# Marathi

## Free Resources

## SCAN QR CODE Now

ICSE ACADEMY

# Past Year Papers

- 2026
- 2025
- 2024
- 2023

Note : There was no board exam in 2021 and 2022 due to COVID.

2026 paper will be shared here in June 2026

ICSE ACADEMY

# 2025

# MARATHI

## (Second Language)

***Maximum Marks : 80***

***Time Allowed : Three Hours***

1. *Answers to this Paper must be written on the paper provided separately.*
2. *You will **not** be allowed to write during the first **15** minutes.*
3. *This time is to be spent in reading the question paper.*
4. ***The time given at the head of this Paper is the time allowed for writing the answers.***
5. *This paper comprises two Sections; **Section A** and **Section B.***
6. *Attempt **all** the questions from **Section A**.*
7. *Attempt **four** questions from **Section B**, answering at least **one** question each from the **two** books you have studied and **any two** other questions from the same books that you have compulsorily chosen.*
8. *The intended marks for questions or parts of questions are given in brackets [ ].*

***Instruction for the Supervising Examiner***

*Kindly read aloud the instructions given above to all the candidates present in the Examination Hall.*

**This Paper consists of 12 printed pages.**



*© Copyright reserved.*



ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY

## SECTION—A (40 Marks)

*Attempt **all** questions from this section.*

**Question 1**

Write a short composition in **Marathi** of approximately **250** words on any **one** of the following topics :— [15]

खालील दिलेल्या विषयापैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे **250** शब्दांचा **मराठीत** संक्षिप्त निबंध लिहा :—

(i) मॉल (Mall) आपल्या जीवनाची आवश्यक बाजू - मॉलमध्ये जाऊन खरेदी करणे म्हणजे आनंद ! आपणही अशी खरेदी करण्यासाठी मॉलमध्ये जात असाल - आपल्या पारंपारिक बाजारपेठांमध्ये केलेली खरेदी व मॉलमध्ये केलेली खरेदी यात कोणता फरक आपणास जाणवतो ?

(ii) प्रत्येकास कोणता ना कोणता छंद (Hobby) असतोच. छंद म्हणजे नेमके काय ? तुम्हीही एखादा छंद जपला असेलच ! कोणता आहेत तुमचा छंद ? .... तुम्हाला तो कसा जडला ? तुम्ही तो कसा जपता ? दिवसभरात त्यासाठी तुम्ही किती वेळ देता ? जीवनात कोणती शिकवण - मिळाली ........... कोणता फरक आपणास जाणवतो ह्या आपल्या अनुभवाबद्दल लिहा.

(iii) प्रत्येकाच्या जीवनात आपल्या कुटुंबाचा फार मोठा प्रभाव असतो आपले कुटुंब - कुटुंबातील व्यक्ती, त्यांच्यातील संवाद - एकमेकांविषयी संवेदना - प्रसंगी त्याग करण्याची तयारी ह्यामुळे आपल्यावर संस्कार होत असतात - आपले अनुभव - आपले कुटुंब - याविषयी लिहा.

(iv) प्रदूषणाची समस्या आम्हीच निर्माण केलेली आहे - म्हणून प्रदूषण थांबवणे ही आमची जबाबदारी आहे !

(v) पुढे दिलेले चित्र पहा व त्याआधारे आपल्या मनात येणाऱ्या विचारांचे निबंध/गोष्ट स्वरूपात वर्णन करा.





Pati's
ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY

**Question 2**

Write a letter in **Marathi** of approximately **120** words on any **one** of the topics given below :— [7]

खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **120** शब्दांपर्यंतचे पत्र **मराठीत** लिहा :—

(i) आपण विविध खाद्यपदार्थ तयार करायला शिकला, शाळेतील 'पाककृती स्पर्धेत' आपण पहिले बक्षीस मिळवले याविषयी आपणास फार आनंद झालेला आहे. याविषयीचे पत्र आपल्या गावी राहणाऱ्या आजीस लिहा.

**किंवा**

(ii) आपल्या शहरात जागोजागी अनावश्यक फलक (Hoardings) लावलेले आहेत. यामुळे शहर अस्वच्छ दिसते. काही फलक धोकादायक अवस्थेत आहेत, ज्यामुळे अपघातही झालेले आहेत याविषयी आपल्या शहरातील महानगरपालिकेस पत्र लिहा व हे फलक काढून टाकण्याची विनंती करा.

**Question 3**

Read the passage given below and answer in **Marathi** the questions that follow, using your own words as far as possible :—

खाली दिलेला उतारा नीट काळजीपूर्वक वाचा आणि त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे तुमच्या स्वत:च्या शब्दांत **मराठीत** लिहा :—

अकबर बादशहाच्या राज्यात किशन व केशव नावाचे दोन शेतकरी राहत होते. ते एकमेकांचे शेजारी होते. त्यांच्या शेताच्या मध्यभागी एक आंब्याचे झाड होते. ते विशाल झाड, पिकलेल्या आंब्यांनी पूर्ण भरलेले होते.

किशन त्या पिकलेल्या आंब्यांपैकी काही आंबे घेणार तोच केशव तेथे आला आणि जोरात ओरडून म्हणाला, "थांब. त्यांना स्पर्श करू नकोस. हे झाड माझे आहे." हे ऐकताच किशन रडकुंडीला येऊन म्हणाला, "नाही .... हे झाड माझे आहे." दोघांमध्ये बराच मोठा वाद झाला. त्याचा काहीच निर्णय लागेना तेव्हा शेवटी किशन म्हणाला, "चल, आपण बिरबलाकडे जाऊ. तोच आपल्याला योग्य न्याय देईल."

किशन व केशव दोघेही 'योग्य न्याय' मिळविण्यासाठी बिरबलाकडे आले. केशव म्हणाला, "बिरबल महाराज, माझ्या शेताच्या सीमेवर एक मोठे आंब्याचे झाड आहे. ते पहिल्यापासूनच माझे होते; पण आता



Pati's ICSE ACADEMY

हा किशन त्याच्यावर त्याचा हक्क दाखवत आहे." यावर किशन म्हणाला, "नाही महाराज ते झाड माझेच आहे. ते अगदी लहानसे रोप असल्यापासून मी त्याला पाणी घालत आलो आहे." बिरबल क्षणभर विचार करून म्हणाला, "या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावणे कठीण आहे. मी तुम्हाला आज्ञा देतो की तुम्ही त्या झाडावरचे सगळे आंबे काढा, मोजा व त्याची तुम्हा दोघांत समान वाटणी करून घ्या. आता राहिले झाड ..... ते तोडा व त्याची लाकडेही तुम्हा दोघांत समान संख्येने वाटून घ्या." केशव सुखावला. त्याला हा योग्य न्याय वाटला. आंबेही मिळतील व झाडाची लाकडेही! ... मात्र किशनला दु:ख झाले. तो बिरबलाला म्हणाला, "महाराज गेली पंधरा वर्षे मी या झाडाला पाणी घालत आहे. त्याची पोटच्या पोराप्रमाणे काळजी घेत आहे. त्या झाडाला तोडणे मला पाहवणार नाही. त्यापेक्षा केशवलाच ते झाड घेऊ दे."

बिरबल मनोमन जे समजायचे ते समजला. त्याने सैनिकांना लगेच आज्ञा केली ... "हे झाड किशनला देण्यात यावे .... तोच त्याचा खरा मालक! नि केशवला चांगलीच शिक्षा करावी ...".

**प्रश्न :**

(i) "थांब. त्यांना स्पर्श करू नकोस." असे कोण, कोणास व का म्हणाले ? [2]

(ii) किशनने व केशवने बिरबलाकडे कोणती तक्रार केली ? [2]

(iii) केशव का सुखावला ? [2]

(iv) बिरबलाला मनोमन नेमके काय समजले होते ? कसे ? – स्पष्ट करा. [2]

(v) बिरबलाने शेवटी कोणता न्याय दिला ? – तो तुम्हाला पटतो का ? ..... कारणासह स्पष्ट करा. [2]

**Question 4**

Choose the correct answer from the options given :— [8]

दिलेल्या पर्यायांतून अचूक उत्तराची निवड करा :—

(i) गोप व तरूणी यांचे लिंग बदलल्यास अनुक्रमे उत्तर पुढील प्रमाणे असेल ............

(a) तरूण व गोप

(b) गोपी व तरूण

(c) गोपी व तारूण्य

(d) गोपि व तरूण



Pati's ICSE ACADEMY

(ii) फुगा व चांदणी यांचे वचन बदलल्यास अनुक्रमे उत्तर पुढील प्रमाणे असेल .........

(a) चांदण्या व फुगे

(b) फुगा व चांदण्या

(c) फुगे व चांदणी

(d) फुगे व चांदण्या

(iii) अरण्य व वानर या शब्दांचे समानार्थी शब्द अनुक्रमे पुढील प्रमाणे असतील ............

(a) कपि व कानन

(b) कानन व कपी

(c) अरण्य व कपी

(d) कानन व वानर

(iv) कृत्रिम व आशा या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द अनुक्रमे पुढील प्रमाणे असतील .........

(a) नैसर्गिक व निराशा

(b) निराशा व नैसर्गिक

(c) कृत्रिम व निराशा

(d) नैसर्गिक व आशा

(v) पाहण्यासाठी जमलेले लोक व स्वत:शी केलेले भाषण -- या शब्दसमूहासाठी एक शब्द अनुक्रमे पुढील प्रमाणे असतील ...........

(a) प्रेक्षक व संवाद

(b) प्रेषक व स्वगत

(c) प्रेक्षक व स्वागत

(d) प्रेक्षक व स्वगत

(vi) लोकांना लघुउद्योग करण्यासाठी प्रोत्साहन दिले तर बेकारीचा व बेरोजगारीचा प्रश्न लवकरच सुटेल. - वाक्याचा प्रकार ओळखा.

(a) आज्ञार्थी वाक्य

(b) प्रश्नार्थी वाक्य

(c) उद्गारार्थी वाक्य

(d) विधानार्थी वाक्य

(vii) अपंग महिलेने एव्हरेस्ट शिखर सर करून जणू ................ योग्य वाक्प्रचार लिहा.

(a) आकाश पाताळ एक केले

(b) आकाशाला गवसणी घातली

(c) अंग काढून घेतले

(d) आभाळ फाटले

(viii) ढग गडगडले ............... पावसाला सुरुवात झाली ............... आईने कपाटातली छत्री काढली.
————— योग्य अव्यय लिहा.

(a) पण, व

(b) वारंवार, साठी

(c) आणि, म्हणून

(d) म्हणून, कारण

## SECTION—B (40 Marks)

*Questions from only **two** of the following textbooks are to be answered.*

*Attempt **four** questions from this section.*

*You must answer at least **one** question from each of the **two** books, you have studied and **any two** other questions from the same books that you have chosen.*

## कथाकुंज (कथा-संकलन)
## KATHAKUNJ (Katha–Sankalan)

**Question 5**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

काल रात्री धड झोप लागली नव्हती. काल परवापासून या दाढेने जीव खाल्लाय. डोळे रडून रडून आटल्यासारखे झालेत. हल्ली डोळ्यांपुढे केसांचा गुंता जसा फिरत असतो. डॉक्टर म्हणतात, 'डोळ्यातलं लिक्विड गढूळ झालय' असू दे ......... मरण्यापूर्वी ज्या यातना सोसाव्या लागतील त्या सोसायलाच हव्यात. भोग सुटलेत का कोणाला!

**बेघर**

**प्रश्न** :

(i) श्रीकांतने आपल्या आईचा विश्वासघात कशाप्रकारे केला ? [2]

(ii) कोणाला निरोप देताना सुधाताईंचे डोळे पाणावले ? का ? [2]

(iii) स्वतंत्रपणे आयुष्य जगणाऱ्या आईच्या कोणकोणत्या गोष्टींवर श्रीकांतने आक्षेप घेतला ? [3]

(iv) 'तू काही सांगायचा हक्क गमावला आहेस,' असे सुधाताई कोणास व का म्हणाल्या ? [3]

## Question 6

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

"काय भानगड आहे हो ?" कुणी तरी जाता जाता मोठ्यानं आणि कुत्सित सुरात विचारतं. मी वळून पहातो.

कुत्सित प्रश्न करणारा माणूस जास्तच कुत्सित हसत लांब जातो. पोर तितक्यात माझ्या धोतराचा सोगा धरतं.

"अरे हट् म्हटलंन!" मी ओरडलो. आणि ओरडलो ही चूक केली हे एकदम वाढलेल्या भोवतालच्या गर्दीवरून जाणवतं.

**माणसाची गोष्ट**

**प्रश्न :**

(i) माणसाच्या कोटाची बाही कोणी, कधी व का पकडली ? [2]

(ii) बाही पकडणाऱ्याने माणसाकडे कशाची मागणी केली ? ती माणसाने पूर्ण का केली नाही ? [2]

(iii) माणसाला कोणाचा राग आला होता ? का ? [3]

(iv) माणसाभोवती कोणी गर्दी केली ? का ? [3]

## Question 7

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

नेहमीच्या खाक्यानं अप्पा म्हणाले, "ही अमला, माझी बायको आणि ही सावित्री माझी मुलगी. हे घर. सावी सगळे सांगेल. घर तुझं आहे." आणि बूट वाजवीत ते ऑफिसच्या खोलीत चालू लागले. मला तसलं फारसं काहीच वाटलं नाही. मुलं ही जनरली स्वकेंद्रित असतात. मनात म्हटलं, चला. अप्पांची बायको आपल्याला काय त्याचं ? इतकी माणसं घरात, त्यात आणखी एक ..........

**पाऊस आला मोठा**

**प्रश्न :**

(i) लोक सावित्रीची कणव का करत ? वर्गात सावित्री रडायचे सोंग का करे ? [2]

(ii) सावित्री वेळोवेळी अम्मीचा कशाप्रकारे अपमान करत असे ? [2]

(iii) सावित्रीने मुंबईला जाण्याचा निर्णय का घेतला ? [3]

(iv) अम्मी गेल्यावर सावित्रीने दु:खाने आकांत का मांडला ? [3]



Pati's ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY

## काव्यांगण (काव्य संकलन)
## KAVYANGAN (Kavya Sankalan)

**Question 8**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

मन वढाय वढाय
उभ्या पिकातलं ढोर
किती हाकला हाकला
फिरी येतं पिकावर

**मन**

**प्रश्न** :

(i) कवयित्री मनाला 'ढोर' आणि 'वादळाची' उपमा का देते ? [2]

(ii) कवयित्रीने मानवी मनाला 'जह्यरी' का म्हटले आहे ? [2]

(iii) कवयित्रीने मनाचा लहान - मोठेपणा कशाप्रकारे दाखवला आहे ? [3]

(iv) कवयित्रीने मनाविषयी कोणाला व कोणता प्रश्न विचारला आहे ? [3]

**Question 9**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

"याच औषधावरी पुढे तो कसातरी जगला,
हृदय थांबूनी कधीच नातरि तो असता 'खपला' !
तोंड आंबलें असेल ज्यांचें प्रेमनिराशेनें,
प्रेमाचा गुलकंद तयांनी चाटुनि हा बघणें ! "

**प्रेमाचा गुलकंद**

**प्रश्न** :

(i) तरूणीचे मन जिंकण्यासाठी तरूणाची धडपड कशी चालू होती ? [2]

(ii) तरूणी त्याला कसा प्रतिसाद देत होती ? तरूणाने त्याचा कोणता अर्थ लावला ? [2]

(iii) तरूणास भोवळ का आली ? तरूणीने त्यावर कोणता उपाय सुचवला ? [3]

(iv) "प्रेमालाभ नच ! गुलकंद तरी कशास हा दवडा ?" असे म्हणणा-या तरूणाची कोणती स्वभाववैष्टिये दिसून येतात ? कवीला प्रस्तुत कवितेतून काय सांगायचे आहे ? [3]



Pati's ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY

**Question 10**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

"जिथे भूमिचा पुत्र गाळील घाम
तिथे अन्न होऊन ठाकेल श्याम
दिसे सावळे रूप त्याचे शिवारी।।"

**जिथे राबती हात**

**प्रश्न :**

(i) शेतक-यास ईश्वर कोणत्या रूपात व कोठे दिसतो ? [2]

(ii) 'वसे तो सदा स्वेदगंगेकिनारी ! कवीला प्रस्तुत ओळींतून काय सांगायचे आहे ? [2]

(iii) ईश्वर कोणाच्या घरी नांदतो ? तो कशाचा भुकेला आहे ? [3]

(iv) प्रस्तुत कवितेतून कवीने काय सांगायचा प्रयत्न केलेला आहे ? [3]

## करूणाष्टक (कादंबरी)

## KARUNASHTAK (Kadambari)

**Question 11**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

माझी आई मनानं फार धार्मिक बाई होती. दारात आलेला भिक्षेकरी काही न घेता परत जाणं तिला मुळीच चालत नसे. गोसाव्याची हाक ऐकून आई उठली. बुचकुलीभर पीठ घेऊन उंबऱ्याशी आली. भगवा गोसावी काखेची झोळी फाकीत दोन पावलं पुढे झाला. पीठ झोळीत टाकून आई म्हणाली. "बाबा, काही विद्या शिकला आहेस, का नुसत्या दाढीजटा वाढवल्या आहेस ?"

**प्रश्न :**

(i) ओढयाकाठच्या घरात आईला कोणता आजार सुरू झाला ? [2]

(ii) आजार बरा करण्यासाठी आईने कोण-कोणते उपाय केले ? [2]

(iii) आईला गोसाव्याकडे पीठ मागण्याची वेळ का आली ? [3]

(iv) गोसाव्याने पीठ दिल्यावर पिठाचे पैसे देण्याविषयी आई गोसाव्याला काय म्हणाली ? प्रस्तुत प्रसंगातून आईविषयी आपणास काय वाटते ? [3]



Pati's ICSE ACADEMY

## Question 12

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

माझा भाऊ शिकायला गेला आणि चांगल्या तऱ्हेने कोर्स पार पाडून परत आला. तात्काळ त्याची बदली तालुक्याच्या गावी झाली. आईला आता, घरची उसाभर करायला, मुलांचं जेवणखाण प्रेमानं करायला घरात दुसरं माणूस हवं होतं.

**प्रश्न :**

(i) आईने घरी येणाऱ्या गुरूजींना भावाविषयी काय सांगितले ? गुरूजी हे काम का करू शकले नाही ? [2]

(ii) लेखकाचा भाऊ अस्वस्थ का झाला ? असा कोणता प्रतिष्ठेचा प्रश्न त्याच्यासमोर होता ? [2]

(iii) हा प्रश्न घेऊन तो आईकडे का गेला ? आईला त्याने कोणता मार्ग सुचवला ? [3]

(iv) आईने कोणत्या गोष्टीसाठी ह्या भावास नकार दिला ? पुढे ह्या भावाचे लग्न थाटामाटात का झाले ? [3]

## Question 13

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

सुरुवातीचे काही दिवस तिला चुकल्यासारखं झालं; पण परिस्थितीशी जुळवून घेण्याचा गुण माणसापाशी असतोच. शहरी संस्कृती आणि शहरी जीवन आईनं लवकरच पचनी पाडलं. आता थोरला आणि मधला अशा तिच्या दोन्ही मुलांची घरं पुण्यात झाली होती. ती कधीमधी चार दिवस राहायला म्हणून माझ्याकडे यायची.

**प्रश्न :**

(i) लेखकाच्या कोणत्या गोष्टी बघून आईला आनंद होत असे ? [2]

(ii) लेखकाच्या कोणत्या गोष्टींचे आईला आश्चर्य वाटे ? [2]

(iii) चार दिवसांतच आई लेखकाच्या घरातून का निघून जायची ? दादांनी आयुष्यभर पुरणाची पोळी का खाल्ली नाही ? [3]

(iv) आईची कोणती इच्छा शेवटपर्यंत पूर्ण झाली नाही ? का ? लेखकास याविषयी वाईट का वाटते ? [3]



Pati's ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY

# रंगस्पर्श (एकांकिका संकलन)
# RANGSPARSH (Ekankika Sankalan)

**Question 14**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

अप्पा : हो ना. म्हणूनच म्हणतो तुझं हे घराचं इतकं आहे तरी काय ?

त्रिंबक :. (गंभीर चेहरा करून खाली पाहात) आहे !

अप्पा : सांग की मला – >

त्रिंबक : (एकदम) म झा मित्र म्हणायला असा तू एकटाच आहेस, अप्पा. आतापर्यंत मनातल्या मनातलं कुणालाच सांगितलेलं नव्हतं. पण तुला सांगतोच आता. आमच्या कोकणातल्या गावी ......

**घर**

**प्रश्न :**

(i) कोकणातल्या गावचा कोणता प्रसंग त्रिंबकने अप्पांना सांगितला ? या प्रसंगाचा तेव्हा त्याच्यावर कोणता परिणाम झाला होता ? [2]

(ii) हा प्रसंग पुन्हा त्रिंबकच्या डोळ्यांपुढे कधी व का लख्ख उभा राहिला ? [2]

(iii) या प्रसंगातील अनुभवांनी त्रिंबकवर कोणता परिणाम घडवला ? का ? [3]

(iv) 'त्या वेळी थट्टाच केली होती मी त्याची.' असे कोण, कोणास व कशा-संदर्भात म्हणाले ? [3]

**Question 15**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

वसंत : हूं ! डॉकटर कापडिया तर ही स्वत:च्या घरची केस समजताहेत.

सविता : त्यांचा फार लोभ आहे रमेशवर त्यांच्याच उत्तेजनामुळे रमेश आज सतारवादक म्हणून पुढे आला.

वसंत : होय ना ! ... पण पुढे बिचाऱ्याचं हे असं होईल याची काय कल्पना त्यांना ?

**अबोल झाली सतार**

**प्रश्न :**

(i) वसंत कोण आहे ? तो सवितेस भेटायला कोठे आलेला आहे ? का ? [2]

(ii) सवितेने 'माहेरी' यावे याविषयी तो सवितेस, रमेशविषयी काय सांगतो ? [2]

(iii) सवितेचे वडील कोण होते ? वडिलांविषयी तिच्या मनात कोणता संशय आहे ? का ? [3]

(iv) सविता वडिलांची माफी का मागते ? वडील तिची कशाप्रकारे समजूत घालतात ? [3]



Pati's ICSE ACADEMY

**Question 16**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

शास्त्री : (कपाळावर हात मारत) आता कुलूप मरू दे. चोरांनी काय काय पळवलं ते बघ आधी. (पाऊल पुढे टाकताच एका बोचक्याला अडकून शास्त्रीबुवा खाली पडतात. पडताच चोर चोर म्हणून किंचाळतात.)

बाई : (एकदम दचकून) कुठाय चोर ?

**चोरी झालीच नाही**

**प्रश्न :**

(i) शास्त्रीबुवांनी बाईना कोणते दागिने दिले होते ? आपली हुशारी ते बाईसमोर कशाप्रकारे दाखवतात ? [2]

(ii) शास्त्रीबुवा व बाई कोठे गेले होते ? चोपडे याविषयी त्यांना काय म्हणाले ? [2]

(iii) तरूणाने स्वत:ची ओळख काय म्हणून करून दिली ? शास्त्रीबुवांनी कशाकशाची चोरी झाली अशी तक्रार केली ? [3]

(iv) तरूणाने झालेल्या चोरीविषयी काय सांगितले ? त्याने सर्वांना कशाप्रकारे धमकावले ? [3]

# MARATHI

*(Second Language)*

***Maximum Marks : 80***

***Time Allowed : Three Hours***

***Answers to this Paper must be written on the paper provided separately.***

*You will **not** be allowed to write during the first 15 minutes.*

*This time is to be spent in reading the question paper.*

***The time given at the head of this Paper is the time allowed for writing the answers.***

*This paper comprises of two Sections : **Section A** and **Section B**.*

*Attempt **all** the questions from **Section A**.*

*Attempt any **four** questions from **Section B**, answering at least **one** question each from the **two** books you have studied and any **two** other questions from the same books you have compulsorily chosen.*

*The intended marks for questions or parts of questions are given in brackets [ ].*

## SECTION—A (40 Marks)

*Attempt **all** questions from this section.*

**Question 1**

Write a short composition in **Marathi** of approximately **250** words on any **one** of the following topics :— [15]

खालील दिलेल्या विषयापैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **250** शब्दांचा **मराठीत** संक्षिप्त निबंध लिहा :—

(i) जीवनात खेळ खेळणे किती महत्त्वाचे आहे ! आज प्रत्येकाची ही गरज आहे. मैदानावर मनसोक्त खेळणे म्हणजे ताण-तणाव दूर सारणे. मन, शरीर निरोगी, प्रसन्न ठेवणे-आपला खेळांविषयीचा अनुभव लिहा. खेळ दुरावले-त्याचा काय परिणाम होतो हे स्वत:च्या शब्दांत लिहा.

(ii) आपल्या जीवनाच्या जडणघडणीत आपली आई, आपले शिक्षक यांच्या इतकाच महत्त्वाचा वाटा असतो, तो आपल्या वडिलांचा..... आपल्या लाडक्या बाबांचा..... तुमच्या आयुष्यात तुमच्या वडिलांचे योगदान किती ? ..... काय ? याविषयी लिहितानाच तुमच्या वडिलांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून द्या..... त्यांचे वागणे, बोलणे..... आवड, नावड, विचार, मते इत्यादीतून त्यांचे तुम्हाला जाणवलेले 'वेगळेपण' शब्दबद्ध करा.

(iii) समजा, समोरच्या व्यक्तीच्या मनातले विचार तुम्हाला कळू लागले तर.....तुम्ही काय कराल. कल्पना करा व आपले विचार लिहा.



© *Copyright reserved.*

Pati's ICSE ACADEMY

(iv) हे जीवन सुंदर आहे–ही ओळ स्पष्ट करणारे अनुभव, आपले विचार, गोष्ट अथवा निबंधस्वरूपात लिहा.

(v) पुढे दिलेले चित्र पहा व त्या आधारे आपल्या मनात कोणते विचार येतात-त्याचे वर्णन करा.



**Question 2**

Write a letter in **Marathi** of approximately **120** words on any **one** of the topics given below :— [7]

खाली दिलेल्या विषयापैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **120** शब्दांपर्यंतचे पत्र **मराठीत** लिहा :—

(i) तुमचा धाकटा भाऊ सध्या सतत मोबाईलमध्ये गुंग असतो.....त्याचे अभ्यासाकडे, आरोग्याकडे, खेळाकडे संपूर्ण दुर्लक्ष झालेले आहे – ..... तेव्हा..... मोबाईलच्या या व्यसनाचे फायदे-तोटे समजावत, योग्य मार्गदर्शन करणारे पत्र त्याला लिहा.

**किंवा**

(ii) 'पर्यावरणाचे रक्षण' ही आपली जबाबदारी आहे....असे मानणाऱ्या तुमच्या वर्गाने 'प्लास्टिक बंदी' उपक्रम संपूर्ण शाळेभर राबवून जनजागृती करण्याची योजना आखलेली आहे. या योजनेची माहिती देणारे व ही योजना आपल्या शाळेत राबविण्याकरिता परवानगी मागणारे पत्र तुम्ही 'विद्यार्थी प्रतिनिधी' (Student Representative) ह्या नात्याने शाळेच्या मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका यांस लिहा.



Pati's ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY

**Question 3**

Read the passage given below and answer in **Marathi** the questions that follow, using your own words as far as possible :—

खाली दिलेला उतारा नीट काळजीपूर्वक वाचा आणि त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे तुमच्या स्वत:च्या शब्दांत **मराठीत** लिहा :—

एका लग्नाला गेलो होतो. जेवणाचा थाटमाट पाहून थक्क झालो. जवळ जवळ वेगवेगळया पदार्थांचे चाळीस काउंटर मांडून ठेवले होते. तुम्हाला सांगतो, एकही पदार्थ कधी घरी बनवून खाल्ला नव्हता असे सर्व पदार्थ होते. स्वच्छ चकचकीत ड्रेस घातलेले वेटर्स इथे तिथे हसतमुखाने पाहुण्यांची विचारपूस करत फिरत होते.

पंचपक्वान्न म्हणजे काय, ते आज कळले मला ! हातात ताट घेऊन मी सगळया काउंटरवरून फिरलो..... सारे पदार्थ घेतले.... पत्नीने हात खेचत म्हंटले, "अहो, जरा दमानं..... मिळते म्हणून सर्वच घेऊ नका. मग फेकून दयाल." मी लक्ष न देता माझ ताट पूर्ण भरून घेतले आणि शांतपणे जेवायला सुरूवात केली. थोडे खाल्ल्यावर माझे पोट गच्च झाले. नाइलाजाने उरलेले अन्न मी फेकायला गेलो. रिकाम्या डब्याजवळ एक माणूस दिसला .....त्याच्या चेहऱ्यावरून तो सभ्य वाटत होता. माझ्याकडे हसून पाहत हातातील ताट घेतले व म्हणाला, "सर, रागावणार नसाल तर एक विचारू ?..... हे उरलेले जेवण मी तुम्हाला पार्सल करून देऊ का ? .....म्हणजे तुम्ही ते घरी नेऊन संध्याकाळीही जेवू शकाल....." मला हा अपमान वाटला..... त्याचा रागही आला. "रागावू नका...." तो गोड हसत म्हणाला..... 'हे मोठयांचे लग्न. पैशांची अजिबात काळजी करू नका म्हणून सांगितलंय .....बाराशे माणसांचे जेवण बनवले आम्ही ! कितीतरी अन्न उरणार ! ते आम्ही बाहेरच्या काही भिकाऱ्यांना देऊ .....मात्र हे ताटात अधिकचे घेऊन वाया घालवलेले अन्न ? त्याचे काय ? आजच्या हजार लोकांच्या जेवणासाठी गेले चार दिवस आम्ही मेहनत करतोय. उत्कृष्ट दर्जाची भाजी, मसाले खरेदी केले. पहाटे चार वाजल्यापासून माझी माणसे तुम्हाला वेळेवर अन्न मिळावे, उत्तम, चविष्ट जेवण मिळावे म्हणून राबताय. आम्ही मागू तेवढे पैसे यजमानांनी दिलेत..... पण सर्व गोष्टी पैशांनी मोजता येत नाहीत. अशी अनेक अर्धवट भरलेली ताटे डब्यात फेकून दिलेली पाहून जीव तुटतो आमचा..... म्हणून आम्ही ही शक्कल, युक्ती लढवली. हॉटेलमध्ये कसे, तुम्ही उरलेले अन्न पार्सल द्यायला सांगता !... का तर तुम्ही पैसे मोजलेले असता. मग इथे का नाही ..... ?माझे म्हणणे तुम्हाला पटले तर तुमचे हे अन्न..... आणि त्यात थोडी भर टाकून घरी घेऊन जा.... नाहीतर ताटात वाढलेले पूर्ण खा."

इतक्यात पत्नी म्हणाली, "बरोबर आहे तुमचे भाऊ ! ह्यांना काय कळते.... किती मेहनत असते यामागे ! हवे तसे घ्यायचे नि उरलेले फेकायचे..... तेव्हा करणाऱ्याला किती वेदना होतात ! द्या आम्हाला ते पार्सल करून .....आता रात्रीचे जेवण होईल. मेहनत, आणि इंधनही वाचेल.



Pati's ICSE ACADEMY

मला काही सुचेना..... काय बोलावे ! थोडी लाजही वाटली नि पटतही होते..... खरेच, भारतातच काय पण संपूर्ण जगात आज लाखो लोक अन्नासाठी भटकतात आणि आपण इथे अशा प्रकारे अन्न फेकून देतो !

**प्रश्न :**

(i) 'पंचपक्वान्न म्हणजे काय, ते आज कळले मला !' असे लेखकाने का म्हंटले आहे ? [2]

(ii) लेखकाला 'सभ्य माणसाचा' राग का आला ? [2]

(iii) 'सभ्य माणसाच्या' गटाने कोणती शक्कल लढवली होती ? का ? [2]

(iv) 'अन्न हवे तसे घ्यायचे नि उरलेले फेकायचे.' या वृत्तीमुळे कोणकोणते नुकसान होते ? स्पष्ट करा. [2]

(v) हॉटेल्स, विविध समारंभ या ठिकाणी असे बरेच अन्न वाया जाते. — या अन्नाचा योग्य उपयोग कसा करावा ? ते वाया जाऊ नये म्हणून काय करावे ? यावर कोणतेही दोन उपाय सविस्तर लिहा. [2]

**Question 4**

Choose the correct answer from the options given :— [8]

दिलेल्या पर्यायांतून अचूक उत्तराची निवड करा :—

(i) पाटील व श्रीमान यांचे लिंग बदलल्यास अनुक्रमे उत्तर पुढीलप्रमाणे असेल ............

(a) पाटलीन व श्रीमंती

(b) पाटलीण व श्रीमती

(c) श्रीमंती व पाटलिण

(d) पाटिलकी व श्रीमती

(ii) फूल व पाखरू यांचे वचन बदलल्यास अनुक्रमे उत्तर पुढीलप्रमाणे असेल .........

(a) फल व पाखरे

(b) फुलं व पक्षीण

(c) सुमन व पाखरे

(d) फुले व पाखरे

(iii) काळोख व नमस्कार या शब्दांचे समानार्थी शब्द अनुक्रमे ............

(a) अंधार व वंदन

(b) काळोखी व आभार

(c) आंधार व नमस्ते

(d) काळाशार व वंदनीय

(iv) अमृत व साक्षर या शब्दांचे विरूद्धार्थी शब्द अनुक्रमे .........

(a) विषारी व निराक्षर

(b) अमर व साक्षरता

(c) अमृतमय व नि:अक्षर

(d) विष व निरक्षर

(v) मेहनत करेल तोच यशस्वी होईल ......... काळ ओळखा.

(a) भविष्यकाळ

(b) वर्तमानकाळ

(c) भूतकाळ

(d) मिश्रकाळ

(vi) तोंडातोंडी चालत आलेली गोष्ट व मोफत पाणी मिळण्याची सोय या शब्दसमूहांसाठी एक शब्द अनुक्रमे .......

(a) स्वगत व धबधबा

(b) दंतकथा व पाणपोई

(c) कथा व पाणवठा

(d) गप्पागोष्टी व जलदान

(vii) सगुणाचा तिटकारा करणारी तिची सासू, सगुणाने कितीही उत्तम स्वयंपाक केला तरी त्याला नावे ठेवत असते..... म्हणतात ना !......

(a) लेकी बोले सुने लागे

(b) चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे

(c) नावडतीचे मीठ अळणी

(d) दुरून डोंगर साजरे

(viii) आवडते पुस्तक हरवल्यामुळे ताईने घरात अगदी ............ योग्य वाक्प्रचार लिहा.

(a) आभाळ कोसळले

(b) आकाशाची कुऱ्हाड झाली

(c) आकाशाला गवसणी घातली

(d) आकाशपाताळ एक केले

Pati's ICSE ACADEMY

**SECTION—B (40 Marks)**

*Questions from only **two** of the following textbooks are to be answered.*
*Attempt **four** questions from this Section.*
*You must answer at least **one** question from each of the **two** books you have studied and **any two** other questions from the same books that you have chosen.*

**कथाकुंज (कथा संकलन)**

**KATHAKUNJ (Katha Sankalan)**

**Question 5**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—
खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

सृष्टीचे खेळणे चालले होते. मी त्यावर कल्पना करीत होतो. पण माझ्याही घरात आज एक खेळ होणार होता. काही तरी विषयीची वीज आज माझ्या घरात चमकणार होती.

पुन्हा एकदा बाहेर वीज कडाडली.

— आणि त्याच वेळी घरात माझी आई ओरडली, "कार्टे....."

**दुधावरची साय**

**प्रश्न :**

(i) "कार्टे....." असे आई कोणावर ओरडली ? का ? [2]

(ii) शांती कोण होती ? ती कुठे राहत होती ? का ? [2]

(iii) शांती थरथरत का उभी होती ? तशा अवस्थेतही तिने काय केले ? [3]

(iv) शांतीच्या तोंडून आपली गत भगिनी बोलली–असे लेखकास केव्हा वाटले ? तो समाधानी का झाला ? [3]

**Question 6**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—
खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

"आई-''

"काय रे, दमलास ?"

"दमलो नाही; पण आई शेत कुणाचं ग ?"

"असेल कुणातरी खोताचं; इनामदाराचं."

**चोरी**

**प्रश्न :**

(i) शाळा सुटल्यावर आई गोपूला कुठे घेऊन गेली ? का ? [2]

(ii) शेतातील धान्य गोळा करताना गोपूच्या मनात कोणकोणते विचार आले ? [2]

(iii) रानचिमण्यांची मौज पाहत चालता चालता गोपू कोठे जाऊन पोहोचला ? तेथे त्याने कोणते दृश्य पाहिले ? [3]

(iv) आईने गोपूने दिलेली भातकेसरे का नाकारली ? तिने त्याला कसे पटवून दिले की त्याने चोरी केलेली आहे ? [3]



Pati's ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY

**Question 7**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

संभाषण थांबले. ते स्वाभाविकच होते. बाहेरून आलेल्या माणसाला अवघड वाटू नये म्हणून शारदाबाईनी इकडचे तिकडचे बोलायला, प्रश्न विचारायला सुरूवात केली. संभाषणाचा ओघ पुन्हा चालू केला. "आपण कुठं असता ?" "बेळगावला!"

**पारंब्या**

**प्रश्न :**

(i) शारदाबाईचे मन मुंबईत का रमत नसे ? [2]

(ii) काळे कोण होता ? सांगलीकरला त्याची कशी मदत झाली ? [2]

(iii) सांगलीकरचा फोन आल्यावर शारदाबाई का गोंधळल्या ? सांगलीकर कोण होता ? [3]

(iv) 'कादंबरी छापायची नाही' असा निर्णय कोणी व का घेतला ? [3]

## काव्यांगण (काव्य संकलन)

## KAVYANGAN (Kavya Sankalan)

**Question 8**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

.....मज होय शोककारी
नोहेच हाक माते
मारी कुणी कुठारी
आई कुणा म्हणू मी ?

**आई**

**प्रश्न :**

(i) 'आई कुणा म्हणू मी ?' असा प्रश्न बालकाला का पडला आहे ? [2]

(ii) कोणकोणती दृश्ये पाहून बालकाचा अंतरात्मा व्याकूळ होतो ? का ? [2]

(iii) प्रस्तुत कवितेत आईची महती कशी वर्णिलेली आहे ? स्पष्ट करा. [3]

(iv) 'मज त्याज्य पुष्पमाला' असे कोण व का म्हणते ? [3]



Pati's ICSE ACADEMY

## Question 9

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

उठती वरतीं जलदांवरती
अनंत संध्याराग पहा
सर्व नभावर होय रेखिलें
सुंदरतेचे रूप महा.

**श्रावणमास**

**प्रश्न :**

(i) श्रावणातील इंद्रधनूला कवीने कशाची उपमा दिली आहे ? स्पष्ट करा. [2]

(ii) 'बलाकमाला' पाहून कवीच्या मनात कोणकोणत्या कल्पना येतात ? धरणीवर कोण उतरले आहे ? [2]

(iii) पशू-पक्षी आनंदात आहेत – हे वर्णन कवी कसे करतो ? गोप काय करत आहे ? [3]

(iv) श्रावणात कोणती फुले फुलतात ? बाला व ललना काय करतात ? [3]

## Question 10

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

बरा म्हणून हा इथे
दिवा पारवा पाऱ्याचा;
बरी तोतऱ्या नळाची
शिरीं धार, मुखीं ऋचा.

**किती तरी दिवसांत**

**प्रश्न :**

(i) किती तरी दिवसांत आपण कोणकोणत्या गोष्टी केल्या नाहीत असे कवी म्हणतो ? [2]

(ii) कवीला कशाची भीती वाटते ? का ? [2]

(iii) त्याला निर्भय का व्हायचे आहे ? शहर आणि खेडे ह्यांच्या जगण्यात कोणता फरक आहे ? [3]

(iv) त्याने शहरी जीवनाशी कशाप्रकारे तडजोड केलेली आहे ? का ? [3]



Pati's ICSE ACADEMY

## करूणाष्टक (कादंबरी)

## KARUNASHTAK (Kadambari)

### Question 11

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

आमच्या घराच्या पायऱ्या उतरून ओढयाकडे जाणाऱ्या फरशी रस्त्यावर आलं आणि थेट गावात जाणारा चढ पार करून आपण साध्या रस्त्यावर आलो, की उजव्या बाजूला तांबेमास्तरांचा वाडा होता वाडयात मास्तर, मास्तरांची म्हातारी आई व कनवाळू बायको व माझ्याच वयाचा लहान मुलगा होता.

**प्रश्न :**

(i) तांबेमास्तरांच्या बायकोमध्ये व लेखकाच्या आईमध्ये कशाप्रकारे मैत्री झाली ? [2]

(ii) तांबेमास्तरांच्या श्रीमंतीचे वर्णन लेखक कसे करतात ? [2]

(iii) तांबेमास्तरांची बायको मध्यरात्री आईकडे का आली होती ? [3]

(iv) तांबेमास्तरांच्या उदाहरणांतून आई मुलांना काय शिकवते ? यातून आईविषयी लेखक काय सांगतात ? आपणास आईविषयी काय वाटते ते 2-3 ओळींत लिहा. [3]

### Question 12

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

हया पोरांचं नशीब काही चांगलं दिसत नाही, त्याची फरफटच होत राहणार असं आईला वाटत असले पाहिजे. आम्ही लहानधाकटी मुलं असताना तिला बंद दाराशी झोंबणारा नाग जसा दिसला होता, तसाच तो काही मुलांच्या मोठेपणीसुद्धा अधूनमधून दिसत असला पाहिजे.

**प्रश्न :**

(i) आईचा लेखकावर जीव होता - असे लेखकास का वाटे ? [2]

(ii) लेखकाला असे का वाटे की आईच्या मनात त्याच्याविषयी कणव होती ? [2]

(iii) आईने लेखकावर कशाप्रकारे विश्वास दाखवला ? याविषयी लेखकाच्या मनात कोणती खंत निर्माण झाली ? त्याला अपराधी का वाटले ? [3]

(iv) आई कशाप्रकारे दानधर्म करत असे ? गोकुळाष्टमी ती कशाप्रकारे साजरी करे ? [3]



ICSE ACADEMY

## Question 13

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

एखादया भुसनळ्याप्रमाणं डोळे दिपवणारं आजूबाजूचा काळोखा उजळून टाकणारं ह्या आपल्या मुलाचं कर्तृत्त्व आईनं फार जवळून पाहिलं होतं. त्याचा सगळा प्रवासच तिच्या परिचयाचा होता. आपल्याला एकट्यालाच वर-वर जायचं नाही, सर्वांना घेऊन जायचं आहे.

**प्रश्न :**

(i) ग.दि. माडगूळकरांनी एका पिढीचं भावजीवन समृद्ध केलं-याविषयी लिहा. [2]

(ii) आई सुशिक्षित नसली तरी सुसंस्कृत, शहाणी होती-असे लेखक का म्हणतात ? [2]

(iii) आईच्या धार्मिकतेविषयी लेखक काय सांगतात ? [3]

(iv) आईला जीवनात काय मिळाले नाही-लेखकाला कोणत्या गोष्टींविषयी खंत वाटते ? [3]

### रंगस्पर्श (एकांकिका संकलन)

### RANGSPARSH (Ekankika Sankalan)

## Question 14

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

विठ्ठल : बरं, निदान मला विठ्ठलाचं काम तरी द्या, नोकरी शोधतोय मी ----

जगन्नाथ : सोमनाथ, विठ्ठलाच्या कामाला फिगर बरी आहे–

सोमनाथ : पण फीचर्स बरे नाहीत–

विठ्ठल : अहो, पण मी खरा विठ्ठल आहे.

सोमनाथ : असाल हो ! पण आमचा त्रिलोचनकुमार आज दहा मायथालॉजी पिक्चरचा पेटंट विठ्ठल आहे; लोक पाया पडतात त्यांच्या.

**विठ्ठल तो आला आला**

(i) "माझ्याही पाया पडतात, भटजींना विचारा!" विठ्ठलाच्या या वक्तव्यावर पुढे काय घडले ? [2]

(ii) विठ्ठलाने भटजीचे काम मागितल्यावर आंधळ्या भक्ताने काय प्रतिक्रिया व्यक्त केली ? [2]

(iii) भटजींनी विठ्ठलाला आपले काम न देण्याबद्दल काय सांगितले ? त्यांना गाभाऱ्यात उभे राहण्याबाबत कसे पटवून दिले ? [3]

(iv) 'तुमच्या दयेने आंधळा व्हता –– तसंच ऱ्हाऊ द्या," असे आंधळा भक्त कोणाला व का म्हणाला ? प्रस्तुत नाट्यातून लेखकाला काय सांगायचे आहे दोन ओळीत लिहा. [3]

## Question 15

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

सविता : पंधरा दिवस दौऱ्यावर होता तुम्ही दोघं ! कलकत्ता, टाटा नगर, भिलाई, गोंदिया एवढी मजल अन् इतक्या मैफली. इथं परत आल्यावर घरच्या मंडळींना बघून यायला अमरावतीला गेलातेही आम्हीच आग्रह केला म्हणून, काय चुकलं त्यात तुमचं ? रमेशच्याच मागं तुम्ही सावली सारखे-

दामू : पण नेमका त्या अभद्र वेळेला नव्हतो ना ? मी असतो, तर कशाला रमेशभय्यांना स्वत: तो अंक आणायला जावं लागलं असतं.

**अबोल झाली सतार**

(i) रमेश रविवारचा अंक आणण्यासाठी कोठे गेला होता ? [2]

(ii) अंक आणण्यासाठी गेलेल्या रमेशच्या बाबतीत काय घडले ? वसंताने सवितेस काय सल्ला दिला. [2]

(iii) वसंताने सवितेवर कोणते आरोप केले ? [3]

(iv) सवितेचे वडील कोण होते ? सवितेस त्यांच्याविषयी काय संशय होता ? हा संशय त्यांनी कसा दूर केला ? [3]

## Question 16

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

शकू : (पुन्हा कुंठीत होत) मग कोण बरं ? छे ! काय डोकं झालंय माझ! कामाशिवाय काही दिवस राहिल्यामुळे कसं गंजून गेल आहे! त्याला काय पाहिजे, बेरीज वजाबाक्या, गाड्यांची टाईमटेबले, घड्याळाचे अंदाज, देणेक-याचे वायदे --- काम पाहिजे त्याला. काय पाहिजे. (मुद्रेवरचा, गहन भाव कमी जास्त होतो, हळूच एक ओझरते स्मित येतं.) आहे मला नोकरी.

मोने : (भोवतालच्या एकटक नजरांकडे दुर्लक्ष करून) असं ?

**चार दिवस**

(i) शकू कोण होती ? तिच्यावर कुटुंबाच्या कोणत्या जबाबदाऱ्या होत्या ? का ? [2]

(ii) गेले चार दिवस शकू ऑफिसला न येण्यामागे काय कारण होते ? तिच्या नसण्यामुळे ऑफिसातले वातावरण कसे झाले होते ? [2]

(iii) 'इथल्यापेक्षा खूप छान आहे ती नोकरी -- तशी नशीबवान आहे मी!' असे शकू का म्हणाली ? [3]

(iv) शकूने आपल्या नवऱ्याविषयी कोणती माहिती ऑफिसातल्या लोकांना सांगितली ? ती असे का वागत होती ? [3]

Pati's ICSE ACADEMY



# MARATHI
**(Second Language)**

***Maximum Marks : 80***
***Time Allowed : Three Hours***
***Answers to this Paper must be written on the paper provided separately.***

*You will **not** be allowed to write during the first **15** minutes.*

*This time is to be spent in reading the question paper.*

***The time given at the head of this Paper is the time allowed for writing the answers.***

---

*This paper comprises of two Sections : **Section A** and **Section B**.*
*Attempt **all** the questions from **Section A**.*
*Attempt any **four** questions from **Section B**, answering at least **one** question each from the **two** books you have studied and any **two** other questions from the same books you have compulsorily chosen.*
*The intended marks for questions or parts of questions are given in brackets [ ].*

---

## SECTION—A (40 Marks)
(*Attempt **all** questions from this section.*)

**Question 1**

Write a short composition in **Marathi** of approximately **250** words on any **one** of the following topics :— [15]

खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **250** शब्दांचा **मराठीत** संक्षिप्त निबंध लिहा :—

(i) आजच्या संगणक युगात माणूस कितीही पळत असला, पैशासाठी धावत असला तरी वेळ मिळाल्यास त्याला निसर्गाची ओढ लागते. निसर्गात गेल्याने मनावरचा ताण हलका होऊन मनास प्रसन्न व ताजेतवाने वाटते. तुम्ही देखील अशा एखाद्या निसर्गरम्य ठिकाणाला भेट दिली असेल तर त्या निसर्गरम्य वातावरणाचा अनुभव लिहा.

(ii) व द्धाश्रम म्हणजे काय ? व द्धाश्रमांची संख्याझपाट्याने वाढत आहे, लोकांची बदललेली मानसिकता, दोन पिढ्यांमधील वाढलेले अंतर, आधुनिक जीवनशैली, विभक्त कुटुंब पद्धती, जागेची कमतरता अशी अनेक कारणे पाहायला मिळतात. खरेच सर्व आजी व आजोबा आश्रमात गेले तर काय होईल ? नातवंडांवर प्रेम व संस्कार यांचा अभाव दिसून येईल, परंपरा व संस्कतीचा सगळ्यांना विसर पडेल. खरच वद्धाश्रमांची गरज आहे का ? याविषयी आपले विचार मांडा.

---

**This Paper consists of 11 printed pages and 1 blank page.**



© *Copyright reserved.*

Pati's ICSE ACADEMY

(iii) 'ऑनलाइन शिक्षण' की 'ऑफ-लाइन शिक्षण' विद्यार्थ्यांना कोणत्या शिक्षण पद्धतीतून, शिक्षणमाध्यमातून अधिक फायदा होतो.....याविषयीची तुमची मते मांडा.

(iv) 'करावे तसे भरावे' ही म्हण स्पष्ट करणारे विचार योग्य उदाहरणांसह मांडा किंवा त्यावर आधारित गोष्ट लिहा.

(v) पुढे दिलेले चित्र पहा व त्या आधारे आपल्या मनात कोणते विचार येतात — त्याचे वर्णन करा.



**Question 2**

Write a letter in **Marathi** of approximately **120** words on any **one** of the topics given below :— [7]

खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **120** शब्दांपर्यंतचे पत्र **मराठीत** लिहा :—

(i) जीवनात अभ्यासासोबत योग्य आहार व व्यायामाचीसुद्धा आवश्यकता आहे. याविषयीचे मार्गदर्शन करणारे पत्र इयत्ता नववीत शिकणाऱ्या आपल्या लहान भावास लिहा.

**किंवा**

(ii) तुमच्या परिसरात तुम्हाला खेळण्यासाठी कोणत्याही प्रकारची व्यवस्था नाही. तुम्ही मुले रस्त्यावर येऊन खेळता. अपुऱ्या जागेअभावी तुम्हाला खेळण्याचा आनंदही घेता येत नाही. त्याबद्दल महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना एक उद्यान तयार करण्यासाठी विनंती करणारे पत्र लिहा.



Pati's ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY

**Question 3**

Read the passage given below and answer in **Marathi** the questions that follow, using your own words as far as possible :—

खाली दिलेला उतारा नीट काळजीपूर्वक वाचा आणि त्यावर आधारलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या स्वत:च्या शब्दांत **मराठीत** लिहा :—

एका गावात एक पोस्टमन पत्र वाटप करायचा. एके दिवशी एका घरासमोर उभा राहून त्याने आवाज दिला, ''पोस्टमन ........ '' आतून एका मुलीचा आवाज आला, ''जरा थांबा, मी येतेय'' दोन मिनिटे झाली, पाच मिनिटे झाली. दार काही उघडेना. शेवटी पोस्टमन वैतागला आणि जोरात म्हणाला,'' ''कुणी आहे का घरात ? पत्र द्यायचेत'' आतून मुलीचा आवाज आला, ''काका, दाराच्या खालच्या फटीतून पत्र सरकवा. मी नंतर घेते.'' पोस्टमन म्हणाला, ''तसे चालणार नाही, रजिस्टर पत्र आहे, सही लागेल.'' पाच मिनिटे पुन्हा शांतता. आता रागवून पुन्हा आवाज देणार इतक्यात दार उघडले. दारातली मुलगी पाहून पोस्टमनला धक्का बसला. दोन्ही पायांनी अपंग असलेली एक तरुण मुलगी दारात उभी होती. काठीच्या आधाराने तिला चालत यावे लागत असल्याने वेळ लागला होता. हे सगळे पाहून तो पोस्टमन वरमला. त्याचे मुलीविषयीचे भाव बदलले. पत्र देऊन, सही घेऊन तो निघून गेला. अशीच अधून मधून तिची पत्र यायची, आता मात्र पोस्टमन न चिडता तिची वाट पाहत दारासमोर उभा राहत असे.

असेच दिवस जात होते. दिवाळी जवळ आलेली. एकदा मुलीने पाहिले की, आज पोस्टमन अनवाणी पायाने आलाय. ती काही बोलली नाही. मात्र पोस्टमन गेल्यावर दाराजवळच्या मातीत पोस्टमनच्या पावलांचे ठसे उमटले होते, त्यावर कागद ठेवून तिने माप घेतले नंतर काठी टेकत टेकत तिने गावातील चांभाराकडे तो कागद देऊन एक सुंदर चप्पल जोड खरेदी केला.

रिवाजाप्रमाणे पोस्टमनने गावात दिवाळीची बक्षिशी मागण्यास सुरुवात केली. अनेकांनी त्याला बक्षिशी दिली. असे करता करता तो त्या मुलीच्या घराजवळ आला. या मुलीकडे काय बक्षिशी मागायची ? बिचारीवर आधीच अपंगत्वाचे दु:ख आहे; पण आलोच आहोत तर भेटून जाऊ असा विचार करून त्याने तिला आवाज दिला. मुलीने दार उघडले. तिच्या हातात सुंदर पॅकिंग केलेला बॉक्स होता. तो तिने त्याला दिला आणि सांगितले ही माझ्याकडून बक्षिशी आहे; पण तुम्ही घरी जाऊन हा बॉक्स उघडा.

घरी येऊन त्याने तो बॉक्स उघडला. त्यात सुंदर चपला होत्या आणि त्याही त्याच्या मापाच्या पाहून त्याच्या डोळ्यातून पाणी वाहू लागले.

दुसऱ्या दिवशी पोस्टमन नवीन चप्पल घालून त्याच्या ऑफिसात साहेबांकडे गेला आणि म्हणाला, ''फंडातून दहा हजार रुपये कर्ज हवे आहे'' साहेब म्हणाला,'' ''अरे, आधी तुझ्यावर कर्ज आहे. पुन्हा आता कशाला ?'' पोस्टमन म्हणाला, ''मला जयपूर फूट. (लाकडी पाय) घ्यायचे आहेत. त्यासाठी हवे आहेत...''साहेब म्हणाले, ''पण तुझा मुलगा तर धडधाकट आहे, जयपूर फूट कोणासाठी ?'' पोस्टमन



Pati's ICSE ACADEMY

म्हणाला, "साहेब जे माझ्या धडधाकट मुलाला उमजले नाही, ते एका परक्या अपंग मुलीला उमजले आहे. माझे "अनवाणी' दु:ख तिने कमी केले आहे. तिच्यासाठी मी किमान कर्जाने का होईना पण पाय घेऊन देऊ शकतो म्हणून कर्ज हवे आहे." साहेबांसह सर्व स्टाफ नि:शब्द झाला !!

**प्रश्न** :

(i) पोस्टमन का वैतागला ? [2]

(ii) पोस्टमनचे मुलीविषयीचे भाव का बदलले ? [2]

(iii) पोस्टमनचे अनवाणी पाय पाहून मुलीने काय केले ? [2]

(iv) पोस्टमनने कर्ज काढायचे का ठरवले ? [2]

(v) आपणही असा आनंद कोणाला दिला असेल अशी एखादी घटना लिहा. तुम्हाला त्याविषयी काय वाटले ते लिहा. [2]

**Question 4**

Choose the correct answer from the options given :— [8]

दिलेल्या पर्यायांतून अचूक उत्तरांची निवड करा :—

(i) चिमणा व सेवक यांचे लिंग बदलल्यास अनुक्रमे उत्तर पुढील प्रमाणे असेल ..............

(a) चिमणी व दास

(b) दासी व चिमणा

(c) चिमणी व सेविका

(d) दाश्य व चिमण्या

(ii) कारखाना व पणती यांचे वचन बदलल्यास अनुक्रमे उत्तर पुढील प्रमाणे असेल ..............

(a) कारखाने व पणत्या

(b) कारखाना व पणत्या

(c) कारखाने व पणती

(d) कारखान्या व पणती

(iii) आकाश व डोळा या शब्दांचे समानार्थी शब्द अनुक्रमे ..............

(a) डोळे व आकाश

(b) गगन व नयन

(c) गगन व डोळे

(d) आकाश व डोळे



Pati's ICSE ACADEMY

(iv) अनाथ व स्वस्त या शब्दांचे विरूद्धार्थी शब्द अनुक्रमे .............

(a) निराधार व महाग

(b) महाग व आधार

(c) आधार व स्वस्थ

(d) सनाथ व महाग

(v) आमच्या लहानपणी ऋतूंची छान सरमिसळ असायची .............. काळ ओळखा.

(a) भविष्यकाळ

(b) वर्तमानकाळ

(c) भूतकाळ

(d) मिश्रकाळ

(vi) शेतकऱ्याचे दु:ख व दारिद्रय नाहीसे होण्यासाठी प्रथम तो शिक्षित झाला पाहिजे. वाक्याचा प्रकार ओळखा.

(a) विधानार्थी वाक्य

(b) आज्ञार्थी वाक्य

(c) उद्गारार्थी वाक्य

(d) प्रश्नार्थी वाक्य

(vii) आकाशने वाईट काम केले नव्हते म्हणून तो घाबरला नाही, याला म्हणतात —

(a) खाण तशी माती

(b) करावे तसे भरावे

(c) कर नाही त्याला डर नाही

(d) इकडे आड तिकडे विहीर

(viii) आपला ढोंगीपणा सर्वांसमोर उघड होताच साधूने .............. योग्य वाक्यप्रचार लिहा.

(a) कोंडमारा होणे

(b) गाशा गुंडाळणे

(c) खडे फोडणे

(d) जीवापाड जपणे

Pati's
ICSE ACADEMY

**SECTION—B (40 Marks)**

*Questions from only **two** of the following textbooks are to be answered.*
*Attempt **four** questions from this Section.*
*You must answer at least **one** question from each of the **two** books you have studied and any **two** other questions from the same books that you have chosen.*

**(कथाकुंज)**
**KATHAKUNJ (Katha Sankalan-Short Stories)**

**Question 5**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

काळा ढग कुठेच दिसत नव्हता. मात्र धरणी स्नान मंदिरातून बाहेर पडणाऱ्या तरुणीसारखी दिसत होती. वृक्षलता गुदगुदल्या झालेल्या बालकांप्रमाणे हसत होत्या आणि पाखरे झाडांवर बसून आनंदाने आपली अंगे झाडीत होती. पांढरा ढग स्वर्गाच्या दारात जाऊन पोहोचला. आपल्याला आत सहज प्रवेश मिळेल अशी त्याची कल्पना होती.

**दोन मेघ**

**प्रश्न** :

(i) पांढऱ्या ढगाला दिव्य तेजाचा साक्षात्कार कसा झाला ? [2]

(ii) पांढरा ढग निराश का झाला ? [2]

(iii) पांढऱ्या ढगाला स्वर्गाच्या दारात कोणता अनुभव आला ? [3]

(iv) पांढरा ढग व काळा ढग या दोन रुपकाद्वारे लेखकाने कोणता संदेश दिलेला आहे ? [3]

**Question 6**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

दुपार झाली. शाळेसमोर बांधलेली पितळी घंटा एका पोराने लाकडी ठोकळ्याने बडवली. तिचा घणघणाट साऱ्या खेडयात ऐकू गेला.

लहानगा दिनू कुत्र्याशी खेळत होता. शाळेची घंटा त्याला ऐकू आली नाही. पडवीत चौघडी अंथरूण आई पडली होती. तिने आवाज ऐकला आणि पडल्यापडल्याचं ती म्हणाली, "घंटा झाली बघ शाळेला जा!" असे तिला तीन चार वेळा ओरडावे लागले आणि मग दिनू नाखुशीने उठला.

**शाळा**

**प्रश्न** :

(i) मुलांनी कोठे न जाण्याचा निर्णय घेतला व का ? [2]

(ii) कोणाच्या पायात काटा रूतला ? त्यावर कोणी व कोण कोणते उपाय केले ? [2]

(iii) या निसर्गातील शाळेचा गुरू कोण होता ? त्याने दिनूला काय-काय दाखवले ? [3]

(iv) दिनू उशिरा घरी परतला त्यावेळी आईचा कोणता समज झाला होता ? त्यावेळी दिनूची मनस्थिती कशी होती ? [3]



Pati's
ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY

**Question 7**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

'सावितरा का आलीय ?'

सारजाबाई हलक्या आवाजात म्हणाल्या,

'कुणाला ठावं.'

'तू इचारलं न्हाईस का ?'

'इचारलं, पर सांगतीया कुठं.'

**रुसवा**

**प्रश्न :**

(i) सावित्राला पाहून कोण घोटाळ्यात पडले ? का ? [2]

(ii) माधवराव कोण होता ? तो सावित्राला घेऊन कोठे आला होता ? का ? [2]

(iii) हणमंतराव कोण होते ? त्यांना लेकीविषयी कोणती काळजी वाटत होती ? [3]

(iv) रानबा कोण होता ? त्याने हणमंतरावांना कोणत्या बाबतीत नकार दिला ? का ? [3]

## (काव्यांगण)

## KAVYANGAN (Kavya Sankalan—Poetry)

**Question 8**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

(i) (कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी।।
लसूण मिरची कोथिंबिरि। अवघा झाला माझा हरी।।)

**कांदा मुळा भाजी**

(a) संत सावता माळी यांनी कशास अवघी पंढरी मानली ? का ? [2]

(b) संत सावता माळी यांच्या भक्तीत कर्म व धर्म यांचा सुंदर संगम पाहायला मिळतो, हे प्रस्तुत अभंगाद्वारे स्पष्ट करा. [3]

(ii) शेख महंमद अविंध। त्याचे हृदयी गोविंद।।

**ऐसे केले या गोपाळे**

(a) शेख महंमद प्रस्तुत अभंगातून कोणती उदाहरणे देतात ? [2]

(b) ते स्वत:ला 'अविंध' असे का म्हणतात ? त्याचे हृदयी गोविंद- म्हणजे काय ? [3]



Pati's
ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY

**Question 9**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

पिवळे तांबूस ऊन कोवळे पसरे चौफेर
ओढा नेई सोने वाटे वाहुनिया दूर,
झाडांनी किती मुकुट घातले डोकिस सोनेरी
कुरणांवर शेतात पसरला गुलाल चौफेरी !

**सांयकाळची शोभा**

**प्रश्न** :

(i) कवीने गालिचा असे कशास म्हंटले आहे ? साळीचे शेत कसे आहे ? [2]

(ii) फुलपाखरांच्या पंखांवर कोणते रंग आहेत ? कवी त्यांना 'अचल' का म्हणतो ? [2]

(iii) कवीने 'फुले' असे कोणास म्हंटले आहे ? साळीच्या शेतात काय फुटल्यासारखे वाटते ? का ? [3]

(iv) फुलपाखरे कशी उडतात ? पाखरांविषयी कवी काय म्हणतात ? मावळत्या सूर्याला ते कोणती उपमा देतात ? [3]

**Question 10**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

'ओळखलंत का सर मला' _______ पावसात आला कोणी
कपडे होते कर्दमलेले केसांवरती पाणी,
क्षणभर बसला नंतर हसला बोलला वरती पाहून
गंगामाई पाहुणी आली गेली घरटयात राहून;

**कणा**

**प्रश्न** :

(i) कोणत्या संकटातून तरुण पुन्हा नव्याने उभा राहण्याचा प्रयत्न करत आहे ? तो सरांना ओळखलंत का ? असे का विचारतो ? [2]

(ii) 'प्रसाद' असे तो कशास म्हणतो ? गंगामाईला तो कोणाची उपमा देतो ? [2]

(iii) त्याच्या संसाराची अवस्था कशी झालेली आहे ? त्याची जिद्द आपल्याला कशाप्रकारे दिसून येते ? [3]

(iv) प्रस्तुत कवितेतून कवीला आपल्याला काय सांगायचे आहे ? [3]



Pati's ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY

## करुणाष्टक

**KARUNASHTAK (Kadambari — Novel)**

**Question 11**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

आईच्या कानांवर आवाज आला. “माघारी फिर अजून मध्यान-रात्र आहे.” आई निमूट मागे फिरली. दार ढकलून घरात आली. मोकळी घागर आणि गडू खाली टाकून अंथरूणावर बसली आणि मोठ्याने रामाचा धावा करायला लागली. हुडहुडी भरल्याप्रमाणे तिचा आवाज कापत होता. माझे वडील जागे झाले आणि त्यांनी विचारले.

**प्रश्न :**

(i) आईने पौर्णिमेच्या रात्री, पडवीपलीकडे काय पाहिले होते ? [2]

(ii) ही हकीकत आईने कोणाला सांगतांना मुलांनी ऐकली ? याचा परिणाम मोठ्या भावावर कसा झाला ? [2]

(iii) लेखकाच्या धाकटया भावाच्या पायाला काय झाले होते ? तो या आजारातून बरा कसा झाला ? [3]

(iv) दादांच्या कार्यालयात लेखक का जात असे ? त्या दिवशी तो नाराज का झाला ? [3]

**Question 12**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

लवकर शाळा सुटल्यावर घरी गेलो. घागर घेतली. ती खांदयावर रुतू नये, म्हणून माझी जाड निळ्या कापडाची चड्डी -म्हणजे हाफ पॅन्ट खांदयावर टाकली आणि थेट विहिरीवर गेलो.

दवाखाना बंद होता आणि पाणी आणायला इतक्या उशिरा उन्हाचं कोणी आलं नव्हतं. रहाटाच्या दोराला घागर लावून मी भर्रकन आत सोडली....

**प्रश्न :**

(i) लेखक विहिरीवर का गेला होता ? [2]

(ii) तेथे लेखक का गोंधळला ? [2]

(iii) लेखक विहिरीत उतरतांना काय घडले ? [3]

(iv) प्रस्तुत संकटातून लेखकाची सुटका कोणी व कशी केली ? [3]



Pati's
ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY

**Question 13**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

एक लांबलचक प्रवास संपला. पिकलं पान गळून पडायचंच, हे शहाणपण आपल्या आईबद्दल स्वीकारणं फार अवघड जातं. हे मरण स्वाभाविक नसतं. माहीत असूनही तो अपघातच असतो. मोठा भाऊ गेल्यावर लगेच तिला गावी पोचवलं होतं. तो सगळा प्रसंग आठवला.

**प्रश्न :**

(i) लेखकाला आईच्या मत्यूची बातमी कशी समजली ? [2]

(ii) लेखकाला आई त्याच्या बालपणीच्या कोणत्या आठवणी सांगत असे ? [2]

(iii) प्रस्तुत कादंबरीतील आईची गुणवैशिष्टये लिहा. [3]

(iv) प्रस्तुत कादंबरीतील 'दादा' या व्यक्तिरेखेविषयी लिहा. [3]

## रंगस्पर्श- (एकांकिका संकलन)

### RANGSPARSH- (Ekankika Sankalan)

**Question 14**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

अप्पा : घराचं तुझं हे वेड आहे तरी काय, त्रिंबक ?

त्रिंबक : तुला माहीत आहे किती वर्षापासून माझं हे वेड आहे ते. जिवाचे हाल हाल करून मी पैसे जमवत होतो. बायकोचं,पोरांचं स्वत:चं-कसलंच कुणाचं सुख मी पाहिलं नाही. तुमच्याबरोबर ऑफिसात कधी मी चहाही घेत नव्हतो तेव्हा तुम्ही मला हसत होता—

अप्पा : हो ना. म्हणूनच म्हणतो तुझं हे घराचं इतकं आहे तरी काय ?

त्रिंबक : (गंभीर चेहरा करून खाली पहात) आहे !

अप्पा : सांग की मला —

**घर**

**प्रश्न :**

(i) लहानपणी त्रिंबकरावांची घरची परिस्थिती कशी होती ? त्यांचा उदरनिर्वाह कसा होत असे ? [2]

(ii) त्रिंबकराव दहाबारा वर्षांचे असताना नातेवाईकांच्या घरी कोणता प्रसंग घडला होता ? [2]

(iii) घरासाठी त्रिंबकरावांनी आपल्या पत्नी व मुलावर कशाप्रकारे अन्याय केला ? [3]

(iv) 'घर ! घर ! घर ! नाव नको त्या घराचं', असे कोण म्हणाले व का ? [3]



Pati's ICSE ACADEMY

## Question 15

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

नर्स : हूं ! घ्या !

सविता : (दचकून तंद्रीतून जागी होत) ऊं ? काय ते ?

नर्स : कॉफी ! बरं वाटेल तेवढंच.

सविता : (उदासपणे) नको, खरंच काही नको मला !

**अबोल झाली सतार**

**प्रश्न :**

(i) वसंत कोण होता ? तो सविताला न्यायला का आला होता ? [2]

(ii) वसंताला सविताचे लग्न मान्य का नव्हते ? [2]

(iii) सविताचे वडील कोण होते ? ती त्यांच्यावर कोणता आरोप करते ? [3]

(iv) सविताने रमेशशी लग्न का केले होते ? त्याचा अपघात कसा झाला ? [3]

## Question 16

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

शास्त्री : कपाट उघडून बघ आधी

बाई : उघडून कशाला ? उघडंच आहे.

शास्त्री : (स्वत: कॉटखाली पाहत) काही गेलं का पहा !

बाई : अग्गबाई, दागिने गेले !

**चोरी झालीच नाही**

**प्रश्न :**

(i) खोलीचा दरवाजा पाहून शास्त्रीबुवा व बाई यांच्यात कोणता व का वाद झाला ? [2]

(ii) "तुमचा आपला मुलखावेगळा भित्रेपणा !" असे कोण, कोणास व का म्हणाले ? [2]

(iii) "चोर असला म्हणून काय करणार आहे–" असे कोण, कोणास व का म्हणाले ? [3]

(iv) दागिने जाण्यासंदर्भात बाई व शास्त्रीबुवांनी कोणकोणती मते मांडली ? [3]

ICSE Academy

Prepare for ICSE CLASS 10
Free Resources

SCAN QR CODE Now

History/Civics

Geography

Maths

Physics

Chemistry

Biology

Hindi

Physical Education

Computer Applications



www.spellbeeacademy.com

Pati's

ICSE Academy

Prepare for ICSE CLASS 10
Free Resources

SCAN QR CODE Now

Economics

Commercial Studies

French

Robotics & AI

Home Science

EVS

Marathi

Gujarati

Odiya



**Scan QR code** for Free Access to
500+ Prelim Papers across 20 subjects

